दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
बुलडाणा, शुक्रवार, दि.१३ जून २०२५
वर्ष : ०४, अंक : ३०२
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com




# अहमदाबादेत मोठा विमान अपघात ! २४१ प्रवाशांचा मृत्यू

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१२, अहमदाबाद :** अहमदाबादमध्ये मोठी विमान अपघाताची घटना घडली आहे. या अपघातात २४१ प्रवाशांचा मृत्यू झाल्याची भीती वर्तवली जात आहे. या अपघातात गुजरातचे मुख्यमंत्री विजय रुपाणी यांचा मृत्यू झाला आहे.

यांच्यासह २४१ पेक्षा जास्त प्रवाशांचा या अपघातात मृत्यू झाल्याची भीती वर्तवली जात आहे. या दुखद घटनेनंतर टाटा ग्रुपकडून मोठी घोषणा करण्यात आली आहे. या अपघातात मृत्यूमुखी पडलेल्या प्रवाशांच्या नातेवाईकांना प्रत्येकी १ कोटी रुपयांची मदत दिली जाईल, अशी घोषणा टाटा ग्रुपकडून करण्यात आली आहे. टाटा ग्रुपच्या अधिकृत 'एक्स' अकाउंटवर याबाबत माहिती देण्यात आली आहे. टाटा सन्सचे अध्यक्ष एन. चंद्रशेखरन यांनी याबाबतचा निर्णय घेतल्याचं जाहीर करण्यात आलं आहे.

**टाटा ग्रुपने काय म्हटलं आहे?**

आम्ही एअर इंडिया फ्लाइट १७१ संदर्भातील या दुर्दैवी घटनेमुळे अत्यंत दुःखी आहोत. या क्षणी आमची भावना शब्दांत व्यक्त करणं अशक्य नाही. ज्यांनी आपले प्रियजन गमावले आहेत आणि जे जखमी झाले आहेत, त्यांच्याशी आमच्या प्रार्थना आणि सहवेदना आहेत. या दुःखद घटनेत ज्यांनी प्राण गमावले आहे, त्यांच्या कुटुंबियांना टाटा समूहाकडून प्रत्येकी १ कोटी रुपयांची मदत दिली जाईल. तसेच, जखमींच्या वैद्यकीय खर्चाची पूर्ण जबाबदारी आम्ही घेऊ आणि



त्यांना आवश्यक ती सर्व काळजी आणि सहाय्य प्रदान केले जाईल. याशिवाय, बी. जे. मेडिकलच्या वसतिगृहाच्या उभारणीत देखील आम्ही मदत करू. या अत्यंत कठीण प्रसंगी आम्ही प्रभावित कुटुंबे आणि समुदायांसोबत ठामपणे उभे आहोत, असं टाटा सन्सचे अध्यक्ष एन. चंद्रशेखरन म्हणाले आहेत.

**एक प्रवासी सुदैवाने बचावला**

या भीषण अपघातात आतापर्यंत एक प्रवासी सुदैवाने बचावल्याची माहिती आहे. रमेश विश्वकुमार असं या प्रवाशाचं नाव आहे. हा प्रवासी अ११ या सीटवर बसला होता. या प्रवाशाचा अपघातस्थळावरुन रुग्णवाहिकेत चालत जातानाचा व्हिडीओ समोर आला आहे. रमेश विश्वकुमार यांच्या चेहऱ्याला आणि डोक्याला दुखापत झाली आहे. त्यांच्यावर आता मेडिकल कॉलेजमध्ये उपचार सुरु आहेत. त्यांच्याकडून या घटनेची सविस्तर माहिती मिळण्याची शक्यता आहे. विमानात आधी स्फोट झाला नंतर ते विमान कोसळलं, अशी माहिती त्यांनी माध्यमांना आज दिली.

## हसत्या खेळत्या कुटुंबाचा सेल्फी ठरला अखेरचा; ५ जणांचा विमान अपघातात शेवट



अहमदाबादहून लंडनला निघालेल्या एअर इंडियाच्या विमानाच्या दुर्घटनेत बांसवाडा येथील व्यास कुटुंबातील पाच जणांचा मृत्यू झाला. विमानात बसून काढलेला सेल्फी हा त्यांच्या जीवनातील शेवटचा क्षण ठरला. एअर इंडियाची फ्लाईट एआय-१७१ टेकऑफ केल्यानंतर काही वेळातच मेहगनी नगरच्या रिहायशी भागात कोसळली. या दुर्घटनेत २४२ प्रवाशांपैकी केवळ एक जण बचावला, परंतु व्यास कुटुंबाचा त्यात दुर्दैवी अंत झाला.

**ते स्वप्न अधुरंच राहील...**

डॉ. कोमी व्यास, त्यांचे पती प्रतीक जोशी आणि त्यांची तीन मुले एका नव्या आयुष्याची स्वप्ने घेऊन लंडनला निघाले होते. व्यास कुटुंबाचा शेवटचा सेल्फी शेअर केला आहे. डॉ. कोमी व्यास बांसवाडा येथील प्रसिद्ध डॉक्टर होत्या. उदयपूरच्या पॅसिफिक हॉस्पिटलमध्ये त्यांनी केलेल्या कामामुळे त्या ओळखल्या जात होत्या. कुटुंबासोबत राहता यावे यासाठी त्यांनी दोन दिवसांपूर्वीच नोकरी सोडली होती. प्रतीक जोशी हे मागील सहा वर्षांपासून लंडनमध्ये सॉफ्टवेअर प्रोफेशनल म्हणून कार्यरत होते.कोमी आणि त्यांच्या मुलांना आता कायमस्वरूपी त्यांच्यासोबत लंडनमध्ये स्थायिक होण्याची संधी मिळाली होती.अहमदाबाद विमानतळावर टेकऑफपूर्वी कोमी आणि प्रतीक यांनी मुलांसोबत हसतमुख सेल्फी काढला होता.

**बांसवाडा शहरावर दुःखाचा डोंगर**

ही हृदयद्रावक घटना घडली आणि त्यांचे सारे स्वप्न क्षणात भंगले. अहमदाबाद विमान दुर्घटनेची बातमी बांसवाडात पोहोचताच व्यास कुटुंबाच्या घरी शोककळा पसरली आहे. नातलग, मित्र आणि शेजारी दुःखाने व्याकूळ झाले. बांसवाडा शहरावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. एका प्रतिष्ठित डॉक्टर आणि त्यांच्या कुटुंबाचा अशा प्रकारे अंत होणे, हे अत्यंत दुःखद आहे.या दुर्घटनेमुळे संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे. त्यांच्या जाण्याने एक मोठी पोकळी निर्माण झाली आहे, जी कधीही भरून निघणार नाही. ही घटना केवळ व्यास कुटुंबासाठीच नव्हे, तर संपूर्ण समाजासाठी एक मोठा आघात आहे.

# कोल्हापुरात ढगफुटीसदृश्य पाऊस, ओढे-नाले तुडुंब

## अनेक घरात पाणी शिरलं, जनजीवन विस्कळीत...


**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१२, कोल्हापूर :** शहरासह जिल्ह्याला पावसाने अक्षरशः झोडपलं आहे. गुरुवारी सायंकाळच्या सुमारास विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाने लावलेल्या जोरदार हजेरीमुळे शाळा आणि ऑफिसमधून घरी जाणाऱ्या विद्यार्थी, नागरिकांना मोठी कसरत करावी लागली.

शहरातील अनेक सखल भागात गुडघाभर पाणी साचल्यामुळे तसंच अनेक आस्थापनात आणि घरांमध्ये पाणी शिरल्याने जनजीवन विस्कळीत झालं आहे. तर पुणे-बेंगलोर राष्ट्रीय महामार्गावर अनेक ठिकाणी पावसाचे पाणी आल्याने वाहतूक मंदावली. दुसरीकडे गोकुळ शिरगाव आणि सरनोबतवाडी येथे दोघेजण ओढ्याच्या पाण्यात वाहून गेले असून यातील एकाला आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून रिस्क्यू करण्यात यश आलंय, तर अन्य एकाचा शोध सुरू आहे.

**१५ दिवसांनी पावसाची जोरदार हजेरी...**

तब्बल १५ दिवसांच्या विशांतीनंतर पावसाने पुन्हा आपली बॅटिंग सुरू केली आहे. भारतीय हवामान विभागाने गुरुवारी कोल्हापूरसह राज्यातील अनेक जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट दिला होता. सकाळी झालेल्या पावसाच्या हलक्या सरीनंतर वातावरणात काहीसा उष्मा जाणवत



होता. मात्र सायंकाळच्या सुमारास अचानक सुरू झालेल्या मेघगर्जनेसह तुफान पावसाने कोल्हापूरचे रस्ते जलमय झाले होते. सुमारे तासभर पडलेल्या ढगफुटीसदृश्य पावसामुळे जिल्ह्यातील ग्रामीण भागासह कोल्हापूर शहरात सर्वत्र पाणीच-पाणी पाहायला मिळालं. शहराच्या सखल भागात राजारामपुरी, दुधाळी परिसर, सरनाईक वसाहत, परीख पूल, पाचगाव सह अनेक भागातील घरांमध्ये पाणी शिरल्याने आपत्ती व्यवस्थापन कक्षाकडून या ठिकाणी अडकलेल्या नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आलं.

**रस्त्यावर पाणी आल्याने मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी...**

काही इमारतींच्या बेसमेंटमध्ये पाणी शिरल्याने भर पावसात नागरिकांना आपली वाहनं इतरत्र सुरक्षित हलवावी लागली. तर शहरातील काही भागात विदयुत पुरवठा खंडित करण्यात आला. कोल्हापूर शहरातील राजारामपुरी परिसरातील बागेतील टाकी देखील वाहून गेली असून अनेक खेळणी तुटली. ऐन ऑफिस सुटायच्या वेळेत मुसळधार पावसाचं पाणी रस्त्यावर आल्याने मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाल्याचं दिसून आलं. दरम्यान वाहतूक शाखेच्या पोलिसांनी ऐन पावसात आपली जबाबदारी पार पाडत वाहतूक सुरळीत केली. पहिल्याच पावसाने कोल्हापुरला जलमय केलंय.

**२ जण गेले वाहून गेले, एकाला वाचवण्यात यश...**

पुणे-बेंगलोर राष्ट्रीय महामार्गावरील गोकुळ शिरगाव येथील ओढयावर पाणी आल्यामुळे राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक काहीशी मंदावली होती. याच ठिकाणी ओढ्याचं पाणी पाहण्यासाठी गेलेल्या तरुणाचा तोल जाऊन तो ओढ्याच्या पाण्यात वाहून जात असताना गोकुळ शिरगाव येथील स्थानिक रहिवाशांनी दोरीच्या साहाय्याने त्याला वाचवण्याचा प्रयत्न केला. मात्र हातातून दोरी सटकल्यामुळे पुन्हा तो ओढ्याच्या पाण्यात वाहू गेला, यानंतर तरुणाने पुढे जाऊन झाडाला पकडलं आणि स्थानिक तरुणांनी त्याला पाण्यातून बाहेर काढत रेस्क्यू केलं. तर कोल्हापूर शहराजवळ सरनोबतवाडी येथेही शाळकरी मुलगा सायकलवरून जात असताना पावसाच्या पाण्यात सायकल घातल्याने, पाण्याला प्रवाह जास्त असल्याने सायकलवरून तो वाहून गेला असून जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्षाचं बचाव पथ या मुलाचा शोध घेत आहेत.

**पेरणी केलेल्या शेतांमध्ये पावसाचं पाणी शिरलं...**

आठवडाभरापूर्वी पडलेल्या पूर्व पावसामुळे मशागत झाली नसल्याने शेतकरी बांधव अडचणी सापडले होते, यानंतर पावसाने आठ दिवस उघडीप दिली. शेतीतील मशागती पूर्ण झाल्या. काही शेतकऱ्यांनी पेरणीही केली होती. मात्र ढगफुटी सदृश्य पावसामुळे पेरणी झालेल्या शेतामध्ये गुडघाभर पाणी साचून राहिल्याने पेरणी केलेल्या शेताचं मोठं नुकसान झालं आहे.

# थोडक्यात

## अवकाळीची तुफान फटकेबाजी !

### हदगाव तालुक्यात घरांचे, शेतीचे व वीज प्रकल्पाचे मोठे नुकसान



**अक्षराज : चंद्रकांत भोरे**

**दि.१२, हदगाव (नांदेड) :** मृग नक्षत्राच्या प्रारंभीच हदगाव तालुक्यातील परिसरात रविवारी सायंकाळी आलेल्या वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाने जबरदस्त हाहाकार माजविला विशेषतः भानेगाव, उंचेगाव बेलगव्हाण कोथळा, अंबाळा आणि आजूबाजूच्या गावामध्ये घरांचे व शेतामध्ये असलेल्या टिनशेडचे तसेच सौर ऊर्जा पॅनलची मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

शेतीमध्ये उभ्या असलेल्या भानेगाव येथील केळी पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची दिसून येते, शेतामध्ये बसवलेले सोलर पॅनल उध्वस्त झाल्याने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाल्याची आढळून आले.पंचनामे करून नुकसान भरपाई ची मागणी केली आहे.

हदगाव तालुक्यातील मौजे भानेगाव येथील अंबाजी रणवीर यांच्या राहत्या घरावर विद्युत पुरवठा आसलेला विद्युत खांब पडून त्यांच्या राहत्या घराच्या भिंतीला तडे गेले असून राहते घर पडण्या च्या स्थिती निर्माण झाली आहे. त्यांनी मा.तहसीलदार ,तहसील कार्यालया कडे व विद्युत वितरण कंपनीतकडे अर्जाद्वारे नुकसान भरपाईची मागणी केली आहे.भानेगाव येथे चार दिवसापासून विद्युत पुरवठा खंडित असल्याचे नागरिकांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलतांना सांगितले आहे.

## उपमुख्यमंत्री पवारांकडून जिल्ह्यातील विकास कामांचा आढावा

### विमानतळ विकासाला चालना मिळेल...



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१२, अकोला :** जिल्हा नियोजन समितीचा संपूर्ण निधी योग्य व गुणवत्तापूर्ण कामांवर खर्च व्हावा. २०२५-२६ या वर्षात कुठलाही निधी अखर्चित राहता कामा नये. फेब्रुवारीपर्यंत सर्व नियोजित कामे पार पडतील याची दक्षता घ्यावी, असे निर्देश राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री अजित पवार यांनी दिले. अकोला व वाशिम जिल्ह्यातील विविध विकास कामे व योजनांचा अंमलबजावणीचा आढावा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नियोजन भवनात घेतला. त्यावेळी ते बोलत होते. मृद व जलसंधारण राज्यमंत्री इंद्रनील नाईक, खासदार अनुप धोत्रे, आमदार रणधीर सावरकर, आमदार अमोल मिटकरी, आमदार वसंत खंडेलवाल, आमदार किरण सरनाईक, आमदार संजय खोडके, आमदार साजिद पठाण, आमदार सईबाई डहाके, अप्पर जिल्ह्याधिकारी प्रमोद गायकवाड, महापालिका आयुक्त सुनील लहाने, पोलीस अधिक्षक अर्चित चांडक आदी उपस्थित होते.

बैठकीत उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी जिल्ह्याचे आर्थिक नियोजन, २०२३-२४ या काळातील कामे व त्यावरील खर्चासंबंधित माहिती घेतली. त्याचप्रमाणे, खरीप हंगामासंदर्भात शेतकरी बांधवांना येणाऱ्या अडचणी समजून घेतल्या. शासकीय रुग्णालयांतील वैद्यकीय व्यवस्था व नियोजन याबद्दल सविस्तर माहिती घेतली. उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले की, नियोजन समितीच्या निधीचा अपेक्षित कामांवर खर्च होत नाही व अनावश्यक खरेदी आदींबाबत तक्रारी येतात. असे घडता कामा नये. तसे घडल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल. निधी संपूर्णपणे खर्च होणे आवश्यक आहे. त्यासाठी मुदतीत नियोजनपूर्वक कामे व्हावीत. फेब्रुवारीपर्यंत संपूर्ण कामे पार पाडली पाहिजेत. नाविन्यपूर्ण योजनेत चांगली व भरीव कामे होतील, याची दक्षता बाळगावी.

ते पुढे म्हणाले की, खरीप हंगामात कृषी निविष्ठांच्या विक्रीत लिंकींग अजिबात खपवून घेणार नाही. थेट गुन्हे दाखल करावे. दोषी कंपनीवर ही गुन्हे दाखल करावे. शेतीत व कृषी संशोधनात होण्यासाठी एआयचा वापर शासनाकडून प्रोत्साहन दिले जात आहे. कृषी विद्यापीठाच्या सहकार्याने तशी प्रात्यक्षिके राबवावी. शेतकऱ्यांमध्ये जनजागृती वाढवावी. खरीप पीक कर्ज वितरणाचा आढावाही त्यांनी घेतला. उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले की, शहरातील अंडरग्राऊंड ड्रेनेज सिस्टीमचे काम गुणवत्तापूर्वक पूर्ण करावे. शहराची २५ वर्षाची भविष्यातील वाढ लक्षात घेऊन त्यानुसार नियोजन ठेवून कामे राबवा. शहरातील विकासकामांसाठी महापालिकेला अतिरिक्त निधीची आवश्यकता पाहता तसा प्रस्ताव द्यावा. निधी मिळवून देण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य केले जाईल. प्रधानमंत्री आवास योजनेला पीएम सूर्यघर मोफत वीज योजना जोडली आहे. जास्तीत जास्त गरजूंना त्याचा लाभ मिळवून द्यावा.शासनाने १०० दिवस कृती कार्यक्रमानंतर आता १५० दिवस कार्यक्रम हाती घेतला आहे. त्यात अधिकाधिक कामे पूर्ण करून योजनांचा लाभ जास्तीत जास्त गरजूंना मिळवून द्यावा. प्रधानमंत्री आवास योजना, मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेत उद्दिष्टपूर्ती व्हावी. गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार ही योजना व्यापक प्रमाणावर राबवावी. वैद्यकीय महाविद्यालय व सुपर स्पेशालिटी रूग्णालयाशी संबंधित प्रश्न सोडविण्याची ग्वाही ही त्यांनी दिली.

## संपादकीय



### मराठवाड्याची तहान कधी भागणार ?

मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांतील ग्रामीण भागांबरोबरच त्यांची मुख्यालयाची शहरेही तहानेने व्याकुळ आहेत. त्यांची तहान भागविण्याची आश्वासने राज्यकर्ते परत परत देत आहेत, मराठवाड्याला दुष्काळमुक्त करण्याच्या घोषणाही करीत आहेत. जाहीर सभांमधून याच घोषणांची पुनरुक्ती केली जाते, शिवाय नदीजोड प्रकल्प, समुद्राचे वाहून जाणारे पाणी मराठवाड्याकडे वळवणे असे कल्पक उपायही सुचविले जातात. मात्र, प्रत्यक्षात काहीही होत नसल्याचा आजवरचा अनुभव आहे. नेत्यांची आश्वासने अन् घोषणा केवळ प्रसिद्धीसाठी असल्याचे मराठवाड्यातील नागरिकांना आता कळून चुकले आहे.

मराठवाड्यातील मुख्य शहर असलेल्या छत्रपती संभाजीनगरचा पाणीप्रश्न गंभीर होऊन अनेक वर्षे लोटली. या काळात राज्यात सत्तांतरे होत गेली. सत्ताधीश बदलले; पण हा प्रश्न काही सुटला नाही, उलट अधिकच तीव्र होत गेला. पाणीप्रश्नाच्या आडून अनेकांनी स्वतःच्या तुंबड्या भरल्या. पाणीपुरवठ्याची स्थिती 'सामान्य' असल्यास छत्रपती संभाजीनगरात नागरिकांना दर सहाव्या दिवशी पिण्याचे पाणी मिळते. पाणीपुरवठ्यात बिघाड झाल्यास पाण्यासाठी दहा-बारा दिवस वाट पाहावी लागते. हा बिघाडही आता नित्याचा झाला आहे. पाणीप्रश्नावर आंदोलने झाली, मोर्चे निघाले; पण काही उपयोग नाही. गेल्या आठवड्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पाणीप्रश्नी मुंबईत बैठक घेऊन नवीन पाणीपुरवठा योजनेचे काम ऑक्टोबरमध्ये पूर्ण करण्याचे आदेश दिले. ही बैठक आणि आदेश यांना आगामी महापालिका निवडणुकीची झालर आहे, हे लपून राहिलेले नाही.

लातूर, धाराशिव, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली आणि जालना या शहरांची अवस्था याहून फार वेगळी नाही. या शहरांतील नागरिकांना नळाद्वारे दररोज पाणी मिळत नाही. ते मिळावे यासाठी विशेष प्रयत्नही होत नाहीत. लातूर शहरातील नागरिकांसाठी रेल्वेने पाणी आणावे लागले होते, हे वास्तव विस्मरणात जाऊ शकत नाही. जालन्याचा पाणीप्रश्न बिकटच आहे. छत्रपती संभाजीनगरप्रमाणे जालन्यालाही जायकवाडी धरणातून पाणीपुरवठा होतो. स्वतंत्र पंपहाउस आहे. तरीही 'धरण उशाला आणि कोरड घशाला' अशी स्थिती आहे. नागरिकांनी शहराचे कारभारी बदलून पाहिले; परंतु परिस्थितीत बदल नाही.

नांदेड शहराला विष्णुपुरी प्रकल्पाचा आधार आहे; पण या शहरात रोजचा पाणीपुरवठा नाही. तीन-चार दिवसांनी पाणी मिळते. दिलासा एवढाच, की नळाला तासभर अधिक पाणी राहते. साठा अधिक करता येतो; पण नळाला जास्त वेळ पाणी येते हे उत्तर नाही! यंत्रणेत सुधारणा होऊन दररोज पाणी मिळेल या दृष्टीने उपाययोजना हवी. बीड शहराच्या उशाशी बिंदुसरा प्रकल्प आहे. यंदा मे महिन्यातच हा प्रकल्प ओव्हरफ्लो झाला. या शहराचा पाण्याचा प्रश्नही ओव्हरफ्लो झाल्यासारखा आहे. परभणीत पाणीप्रश्नाची स्थिती वेगळी नाही. हिंगोलीचीही अशीच अडचण आहे. या शहरात पाण्यासह अन्य अनेक प्रश्न नागरिकांना पदोपदी भेडसावतात. त्यावर अद्याप मार्ग निघालेला नाही.

मराठवाड्यातील शहरे आणि शहरांमधील नागरिक खरोखरच तहानलेले आहेत. अनेकदा तर पाणी असूनही पाणी मिळत नाही. त्याला नियोजनाचा अभाव कारणीभूत आहे आणि हा अभाव केवळ बैठका घेऊन किंवा घोषणा करून दूर होणार नाही. पश्चिम महाराष्ट्र, तसेच विदर्भातील प्रमुख शहरांत राज्यकर्त्यांनी जशी सोय लावून दिली आहे, तशीच सोय मराठवाड्यातील शहरांसाठी लावावी लागेल. त्यासाठी प्रसंगी कठोर भूमिका घ्यावी लागेल. एखादी निवडणूक डोळ्यांसमोर ठेवून काम करण्याला काही अर्थ नाही. मराठवाड्यातील प्रमुख शहरांचा पाणीप्रश्न सोडवण्यासाठी कृती आराखडा शासनस्तरावर तयार केला जाणे आणि त्याची अंमलबजावणी होणे अपेक्षित आहे. पाणीपुरवठ्याच्या कामासाठी पाण्यासारखा पैसा खर्च करूनही नागरिकांना पाणी मिळत नसेल, तर होणाऱ्या खर्चावर प्रश्नचिन्ह निर्माण होणे स्वाभाविकच आहे.

# बालमजुरी हद्दपार करूया!

प्रत्येक जिल्ह्यात सध्या विशेष प्रशिक्षण केंद्रे विविध वस्त्यांमध्ये कार्यान्वित आहेत. प्रकल्प अधिकारी यांच्या मार्गदर्शनात शेकडो कर्मचारी काम करतात. या प्रकल्पांतर्गत बालकामगारांना विविध कौशल्य विकास योजनांचा लाभ मिळवून देण्यात येतो. बालकामगारांना अनौपचारिक शिक्षणाबरोबरच त्यांच्यातील कौशल्य व कलागुणांना वाव मिळावा, यासाठी विविध ट्रेडचे व्यवसायपूर्ण प्रशिक्षण देण्यात येते तसेच प्रकल्पाचे कार्य व बालकामगार प्रथेविषयी जनमानसात जनजागृती करण्यात येते. प्रत्येक बालकामगाराला दरमहा १५० रुपये विद्यावेतन देण्यात येत असून महाराष्ट्र राज्य शिक्षण विभागामार्फत विद्यार्थी मित्र अभ्यासक्रमाचा विशेष प्रशिक्षण केंद्रात अवलंब करण्यात येतो, शालेय पोषण आहार, पाठ्यपुस्तके आणि आरोग्य सुविधा पुरविण्यात येतात, बालकामगारांना त्यांच्या आवडीनुसार तसेच त्यांच्यातील कौशल्यास अनुरूप असे व्यवसाय पूर्ण प्रशिक्षण देण्यात येते, बालकामगारांना विविधांगी उपक्रमातून शिक्षणाची गोडी निर्माण करण्यात येते. तसेच जीवन कौशल्य राष्ट्रीय बालकामगार प्रकल्पामार्फत बालकामगारांना जीवन कौशल्य विषयाचा प्रभावी संवाद कौशल्य, स्वत:ची जाणीव, प्रभावी नेतृत्व, निर्णयक्षमता, ध्येय निश्चिती, भावनिक समायोजन, कल्पकता, निरीक्षण निरोगी जीवन यासारख्या विविध विषयांच्या माध्यमातून भावी आयुष्यात सुजाण नागरिक घडविण्याचे प्रयत्न केले जातात. जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनात प्रकल्पाचे कामकाज सुयोग्यरित्या सुरू आहेत. प्रकल्पाच्या सुरूवातीपासून लक्षावधी बालकामगारांना नियमित शाळेत दाखल करण्यात आले आहे. तसेच प्रकल्पामार्फत बालकामगारांना जन्म दाखला, जातीचा दाखला, आधार कार्ड, संजय गांधी निराधार योजना, सुकन्या योजना, मतदान ओळखपत्र, जीवनदायी योजनेचा लाभ मिळवून दिला आहे. यासाठी राज्य शासनाने सन १९८६ सालापासून बालकामगार विरोधी कायदा बनविला असून या कायद्याची अंमलबजावणी योग्य पद्धतीने झाल्यास भविष्यात बालकामगार होण्यास आळा बसेल.

लहानपण देगा देवा, मुंगी साखरेचा रवा... असे आपण नेहमीम्हणतो. कारण बालपणीचा काळ सुखाचा आणि आनंदाचा असतो. ना कसली चिंता ना कसली काळजी, मनसोक्त खेळा, हसा, आनंद लुटा... पण असा हा सुखाचा काळ काही मोजक्याच मुलांच्या नशिबात असतो. कारण जेव्हा आपण घराबाहेर पडून समाजात वावरतो तेव्हा पोटाची खळगी भरण्यासाठी सिग्नलजवळ काही वस्तू विकणारी मुले, हॉटेल, बसस्थानक, रेल्वे स्टेशनवर पाणी वाटणारी, टेबल साफ करणारी मुले पाहतो. अशा मुलांना कुठे सुखाचे बालपण अनुभवायला मिळते? कायदा असूनही त्यांचे बालपण हरवत चालले आहे. हेच ते बालकामगार! १४ वर्षांखालील जी मुले स्वत:च्या आणि आपल्या परिवाराच्या उदरनिर्वाहासाठी मोलमजुरी, रोजगार करतात त्यांना बालकामगार म्हणतात. ज्या वयात शाळेत जावून शिकायचे, खेळायचे, बागडायचे त्या वयात हातात झाडू घेऊन साफ-सफाई करायची, भांडी घासायची, कपडे धुवायचे, विटा उचलायच्या, दगड फोडायचे अशी अनेक कामे करावी लागतात. एकीकडे बोट ठेवलं ती वस्तू विकत घेऊन देणारी हौशी मॉम-डॅड तर दुसरीकडे कामावर पाठविणारी नाईलाज मायबाप. समाजातील हे चित्र कसे बदलेल आणि कोण बदलणार? हा समाजापुढे गहण प्रश्नच आहे. १२ जून हा दिवस देशासह जगात सर्वत्र बालकामगार विरोधी दिन म्हणून साजरा केला जातो. बालकामगारांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याकरिता शासनाच्या श्रम व रोजगार मंत्रालयाच्यावतीने जिल्हास्तरावर राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प राबविण्यात येत आहे.

सन १९८६मध्ये पहिला बालकामगार बंदी आणि नियमन कायदा आला. त्या कायद्यानुसार



**– संकलन व सुलेखन –**
**कृष्णकुमार निकोडे गुरूजी**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३.**

१४ वर्षांखालील मुलांना मजुरी करणे बेकायदेशीर सांगितले. सन २००२मध्ये बालकामगार थांबविणे किंवा बंदी घालण्याचा सर्वानुमते कायदा मंजूर केला. त्या कायद्यानुसार १४ वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलांचे शोषण करणे हा गुन्हा मानला गेला. भारतीय राज्यघटनेचा अनुच्छेद २३ हा मुलांना धोकादायक उद्योग आणि कारखान्यांमध्ये काम करण्यास परवानगी देत नाही. कलम ४५ अंतर्गत देशातील सर्व राज्यांना १४ वर्षांखालील मुलांना मोफत शिक्षण देणे बंधनकारक ठरविले. जिल्ह्या-जिल्ह्यात २००४ पासून जिल्हधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प राबविले जात आहेत. या प्रकल्पांतर्गत ९ ते १४ वयोगटातील धोकादायक, व्यवसायामध्ये काम करणाऱ्या बालकामगारांची शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यात येते. प्रकल्पाचा मुख्य उद्देश बालकामगारांचा त्यांच्या कामापासून परावृत्त करून शैक्षणिकदृष्ट्या सक्षम बनविणे व त्यांच्या पालकांचा आर्थिक स्तर उंचावणे, त्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे हा आहे.

मुले शिकावी म्हणून अशा अनेक योजना शासनाच्या श्रम व रोजगार मंत्रालयामार्फत राबविल्या जात आहेत. राष्ट्रीय बाल कामगार प्रकल्पाच्या माध्यमातून बालकामगार होवू नये, म्हणून सजगता निर्माण केली जात आहे. त्याला जिल्हास्तरावर भरघोस प्रतिसाद मिळत आहे, हेच या प्रकल्पाचे खरे यश आहे. जगामध्ये बालकांना कामगार म्हणून राबविले जाऊ नये आणि बालकांना सर्वांगीण विकासाचा हक्क मिळालाच पाहिजे, हा जागतिक बालकामगार विरोधी दिनामागचा मुख्य उद्देश आहे. महाराष्ट्रात सन १९८६मध्ये बालकामगार कायदा आला; पण तो प्रभावीपणे वापरलेला नाही. सन २०१०मध्ये शिक्षण हक्क कायदा झाला; पण शाळेत अजूनही अनेक जण जात नाहीत. शाळाबाह्य मुले बालकामगार असतात आणि बालकामगार आहेत म्हणून शाळाबाह्य ठरतात. जिल्ह्यात स्थलांतरित बालकामगारांची संख्या अधिक आहे. देशात लाखो मुले शाळेत जात नाहीत. ही गरीब कामगारांची मुले आहेत. याचे सर्वेक्षण होण्याची आवश्यकता आहे. भारतात सन २००९च्या शासन निर्णयानुसार बालकामगार प्रथा रोखण्यासाठी कृती दल स्थापन करण्यात आले, त्याचे जिल्हाधिकारी अध्यक्ष असतात. महिन्यात तीन छापे टाकण्याचे बंधन असताना वर्षात तीन छापे टाकले जात नाहीत. मालकांवर कारवाई करण्यात येत नाही आणि गुन्हेही दाखल केले जात नाहीत, ही फार मोठी शोकांतिका! जिल्ह्याजिल्ह्यांत परप्रांतीय स्थलांतरित अनेक बालकामगार स्वीट मार्ट, कारखाने आणि आईस्क्रीम उद्योगात काम करीत आहेत. कायदे खूप आहेत; परंतु, त्याची अंमलबजावणी होत नाही. बालकामगारांची संख्या कमी होण्याऐवजी वाढतच आहे हेही दुर्दैवच आहे!

**आंतरराष्ट्रीय बालकामगार निषेध दिनानिमित्त आठवडाभर सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी**

# दरडप्रवण भागात तातडीने सुरक्षा जाळ्या बसवाव्यात : उपमुख्यमंत्री शिंदे

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१२, ठाणे :** दरडप्रवण भागात राहणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी सुरक्षा जाळ्या बसविण्याचे काम तातडीने पूर्ण करावे. अतिधोकादायक ठिकाणालगत एसआरए, म्हाडा यांचे प्रकल्प सुरू आहेत अशा प्रकल्पांमध्ये अतिधोकादायक ठिकाणच्या रहिवाशांना सामावून घेण्याबाबत धोरण तयार करावे, असे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले.

कुर्ला विधानसभा मतदारसंघातील विविध समस्यांबाबत आढावा बैठक सह्याद्री अतिथीगृह येथे झाली. यावेळी उपमुख्यमंत्री शिंदे बोलत होते. आमदार मंगेश कुडाळकर, दिलीप लांडे, उपमुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव असीम गुप्ता, मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी, नगरविकास विभागाचे प्रधान सचिव गोविंदराज, एसआरएचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेंद्र कल्याणकर, म्हाडाचे मिलिंद बोरीकर आदी अधिकारी उपस्थित होते.

या भागातील चुनाभट्टी येथे डोंगराळ भागात वारंवार दरड कोसळण्याच्या घटना होत असल्याने तेथील रहिवाशांचे पुनर्वसन करण्याबाबत आमदार कुडाळकर यांनी मागणी केली होती. त्याचबरोबर चांदीवली येथील मतदारसंघात अशाच प्रकारचा भाग असल्याचे आमदार लांडे यांनी यावेळी सांगितले होते. मदत व पुनर्वसन विभागाकडे असलेल्या निधीतून मुंबईतील दरडप्रवण भागातील सुमारे ४२ झोपडपट्ट्यांमधील रहिवाशांच्या सुरक्षेसाठी सुरक्षा जाळ्या बसविण्याचे निर्देश उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

अतिधोकादायक भागावर लक्ष केंद्रीत करावे. याचबरोबर अशा धोकादायक ठिकाणालगत म्हाडा, एसआरएचे प्रकल्प सुरू असतील तर त्या प्रकल्पांमधील काही घरांमध्ये अतिधोकादायक इमारतीत राहणाऱ्या नागरिकांना सर्वोच्च प्राधान्य देता येईल का याबाबत धोरण तयार करावे. अशा धोकादायक ठिकाणी राहणाऱ्या नागरिकांसाठी कायमस्वरुपी उपाययोजना करण्याचे शिंदे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सांगितले.

कुर्ला येथील तकीया वॉर्ड भागात असलेल्या २० एकर जमिनीवरील घरांसाठी क्लस्टर योजना राबविण्याची विनंती यावेळी करण्यात आली. कुर्ला विधानसभा मतदारसंघातील रेल्वे हद्दीतील झोपडपट्टीधारकांच्या समस्यांबाबतही यावेळी चर्चा करण्यात आली.

## लालन..

कार्यकर्त्यांनी करावे
वरिष्ठ आदेश पालन
नकोपदांची लालसा
ते अ वास्तव लालन

फक्त श्रेष्ठीं अधिकार
कुणाकरे मनोमिलन
बाकीच्यांने कष्टायचे
भरवता स्नेहसंमेलन

पर पक्षांतून जे आले
करावे पाद प्रक्षालन
परिवार चुका करता
करावे पातक क्षालन

पक्षांतून बडे चालले
वरचेवर रे भू स्कलन
कार्यकर्त्यांनी हिंडावे
करत नवीन संकलन

गुन्हे झेला अंगावरती
भडकते उग्रआंदोलन
तयार रहावे येता वेळ
भरावयांस जेलदालन

पदर मोड करून करा
श्रेष्ठी पुस्तक प्रकाशन
कौतुक ते जळीस्थळी
जरी न होते आकलन

**– हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

## वाचक पत्र




### जीवावर बेतणारा क्रिकेटचा आनंद...

क्रिकेटचे सामने असोत की सार्वजनिक मोठे पुरस्कार वितरण समारंभ येथे गर्दी हमखास होते. अशा वेळी आयोजकांनी आयोजित केलेल्या समारंभास किती प्रेक्षक निमंत्रित आहेत, जागेची - स्टेडियमचे क्षमता किती प्रेक्षकांची आहे.वाहतूक व्यवस्थेची तयारी कशी केली आहे ,पोलीस मदत, शासकीय संबंधित विभागाच्या कायदेशीर परवानग्या घेतल्या आहेत की नाही हे पाहणे आयोजकांचे कर्तव्य प्रथम कर्तव्य आहे. राह्यलाय चॅलेंजर्स बंगळुरू संघाने आयपीएल चषक जिंकला म्हणून बंगळूरात एम चित्रास्वामी स्टेडियमवर विजेत्या आयोजकांनी ठेवलेल्या समारंभाच्या जागेची क्षमता ३५ हजार प्रेक्षकांची पण बाहेर अडीच लाख क्रिकेट प्रेमींनी गर्दी केल्यामुळेच चेंगराचेंगरीत ११ निष्पपाप क्रिकेट प्रेमींना आपले प्राण गमवावे लागले.असंख्य लोक जायबंदी झाले.याला जबाबदार आयोजक आहेत. पुरेशी व्यवस्था नसतांना छोट्या जागेत मोठा पब्लिक कार्यक्रम घेणे मोठी चुक होती.काही वेळेस काही प्रेक्षक हुल्लडबाजी करुन वातावरण बिघडतात असे तर झाले नाही ना ? याची सखोल चौकशी करण्यात यावी. दोन वर्षापूर्वी १७ एप्रिल रोजी खारघर येथे महाराष्ट्र भूषण सोहोळ्यासाठी आलेल्या गर्दीचा फटका ११ निरपराध प्रेक्षकांना बसला होता. तर सहाशेहून अधिक जनांना अति उष्णतेची बाधा झाली होती. अशा घटना सार्वजनिक कार्यक्रमात होत असतील तर आयोजकांची अक्षम्य चूक आहे. छोट्या जागेत मोठे पब्लिक कार्यक्रम घेण्यात येणार नाहीत यावर सरकारकडून निर्बंध घालावेत म्हणजे भविष्यातील घटना टाळता येतील.


**– महादेव गोळवसकर**
**कुर्ला, मुंबई. ९८६९४७६२०९**

# विंचूर गावचे पुरातन देवस्थान नृसिंह मंदिर

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१२, विंचूर (नाशिक) :** विंचूर गावातील प्रत्येक गल्ली ही आप आपला इतिहास अजून जपून आहे. व इतिहास संशोधकांची वाट बघत आहे. इतिहासाचे सोनेरी पान प्रत्येक गल्लीला आहे. असे हे एक माळी गल्लीत असलेले देवस्थान एक अत्यंत पुरातन देखणे व काशीकर यांनी काळजी घेऊन जपलेले हे श्री नृसिंह देवाचे मंदिर काशिकरांचे मंदिर म्हणूनच ओळखले जाते.

काशीकर घराणे हे भट्ट घराणे, छत्रपति शिवाजी महाराजांचा राज्यभिषेक केला. त्या गागा



भट्ट च्या घराण्याची ती एक शाखा अशी माहिती ते देतात. काशिवरून आले म्हणून काशीकर नाव पडले.

सरदार विंचूरकराचे ते मुखतीयार होते. (विंचूरकरांचा आर्थिक व्यव्हार सांभाळत असे)

सरदार विंचूरकर हे विंचूर गावी येण्या आधी पासून हे घराणे विंचुरात स्थाईक होते. इ.स.१९०८ मध्ये ह्या मंदिराचा जीर्णोद्धार विंचूरकर घराण्याने करून दिला. नरसिंह देवाच्या विविध रूपातील छोट्या- छोट्या तीन व एक मुख्य मूर्ती ह्या मंदिरात आहे.

काशीकर यांनी आपल्या जीवापाड जपलेले हे मंदिर दर्शनासाठी गेल्यावर एक वेगळीच अनुभूती देते. काशीकर घराण्याचा इतिहास नीट अभ्यासल्यास विंचूर चा अजून अपरिचित असा इतिहासा चा उलगडा होईल.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात

### मेटगुताड ग्रामपंचायत व हिलदारी अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने पर्यावरण दिन साजरा




**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.१२, महाबळेश्वर :** जागतिक पर्यावरण दिनानिमित्त ग्रामपंचायत मेटगुताड व हिलदारी अभियानाच्या वतीने ग्रामपंचायत मेटगुताड या ठिकाणी विविध पर्यावरण जनजागृती उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांमध्ये स्वच्छता कर्मचाऱ्यांना सुरक्षा साधनांचे वाटप, स्वच्छता रॅली आणि वृक्षारोपणाचा समावेश होता.

या कार्यक्रमास पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यशवंत भांड, विस्तार अधिकारी विठ्ठल पवार, मेटगुताडचे सरपंच भिकन बावळेकर, ग्रामसेवक तेजस निकम, तसेच ग्रामपंचायत सदस्य व कर्मचारी उपस्थित होते.

जिल्हा परिषद शाळा मेटगुताड येथील १४६ विद्यार्थी व सर्व शिक्षकांनी स्वच्छता रॅलीत उत्स्फूर्त सहभाग घेतला. ही रॅली ग्रामपंचायत कार्यालयापासून सुरू होऊन कुंभळजाई मंदिरापर्यंत पार पडली. मंदिर परिसरात पोहोचल्यानंतर तेथे ३० स्थानिक वृक्षांचे रोपण करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या स्वागताने झाली. त्यानंतर गटविकास अधिकारी यांच्या हस्ते १० स्वच्छता कर्मचाऱ्यांना रेनकोट, हँडग्लोव्ज, मास्क आणि टोप्या यांचा समावेश असलेली सुरक्षा कीट वाटप करण्यात आली. रॅलीमध्ये सहभाग घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाचा समारोप 'स्वच्छतेची शपथ' घेऊन झाला, ज्याद्वारे सर्वांनी स्वच्छ आणि हरित पर्यावरण राखण्याचा निर्धार व्यक्त केला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी हिलदारी टीमने परिश्रम घेतले.

### नवी मुंबईत ईव्ही चार्जिंग स्टेशन




**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१२, नवी मुंबई :** महानगरपालिकेच्या सहभागातून नेरुळ येथील सीवूड मॉल जवळील ज्वेल्स ऑफ नवी मुंबई परिसरात नवीन ई व्ही चार्जींग स्टेशन हे जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून गुरुवार, दिनांक ०५ जून २०२५ रोजीपासून जनतेसाठी खुले करण्यात आले असून ही सुविधा नवी मुंबईकरांसाठी पर्यावरण पूरक आणि शाश्वत वाहतुकीच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे.

ई व्ही चार्जींग स्टेशनमध्ये उपलब्ध असलेल्या सुविधा:

१) दोन चाकी, तीन चाकी व चार चाकी वाहनांसाठी चार्जिंग सुविधा
२) दोन गन फास्टर चार्जर)
३) मोबाईल ॲपद्वारे चार्जिंगसाठी आगाऊ बुकींग सुविधा
४) सार्वजनिक वापरासाठी २४७ सेवा उपलब्ध
५) सुरक्षित आणि प्रशस्त पार्किंगची सुविधा
६) आधुनिक आग प्रतिबंधक उपाययोजना
७) विश्रांतीसाठी शांत परिसर व खेळाचे मैदान
८) परवडणारे दर आणि सोयीस्कर वापर

ही सेवा सुरू करण्यामागचा मुख्य उद्देश म्हणजे इलेक्ट्रीक वाहनधारकांना शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी चार्जिंगची सोपी व सुरक्षित सुविधा पुरविणे हा आहे. जेणेकरून हरित व प्रदूषणमुक्त नवी मुंबई घडविण्याच्या दिशेने आणखी एक महत्त्वाचे पाऊल उचलले जाईल.

नवी मुंबईतील या पहिल्या सार्वजनिक ई व्ही चार्जिंग स्टेशनमुळे, शहरात इलेक्ट्रीक वाहनांचा वापर वाढण्यास प्रोत्साहन मिळेल, आणि पर्यावरण रक्षणास चालना मिळेल असा विश्वास नवी मुंबई महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी व्यक्त केला आहे.

त्या अनुषंगाने सर्व इलेक्ट्रीक वाहन धारकांनी या सुविधेचा मोठ्या प्रमाणात लाभ घेण्याचे आवाहन नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या वतीने करण्यात येत आहे.

### पहिल्याच दिवशी मिळणार विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१२, नवी मुंबई :** महानगरपालिका क्षेत्रातील शाळांमधील पहिली ते आठवीचे वर्ग १६ जूनपासून सुरू होत असून शाळेच्या पहिल्या दिवशीच मुलांना मोफत पाठ्यपुस्तके वितरित केली जाणार आहेत. याबाबतची सर्व तयारी महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार शिक्षण विभागाने केलेली असून इयत्ता पहिली ते आठवीच्या नवी मुंबई महानगरपालिकेच्या तसेच खाजगी अनुदानित अशा एकूण १५२ शाळांमध्ये शिकत असलेल्या ६१८७९ विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके पुरवण्यात येणार आहेत.

इयत्ता पहिली ते आठवीमध्ये शिकणारे कोणतेही बालक पुस्तकापासून वंचित राहू नये आणि त्याला पाठ्यपुस्तकाअभावी शिक्षणात अडचण येऊ नये तसेच शाळेत दाखल सर्व मुलांची १००% उपस्थिती टिकविणे त्याचप्रमाणे गळतीचे प्रमाण शून्यावर आणणे यासाठी समग्र शिक्षा अंतर्गत मोफत पाठ्यपुस्तके ही योजना सुरू करण्यात आलेली आहे.

मोफत पाठ्यपुस्तक योजना सन २०२५- २६ करिता विभागीय पाठ्यपुस्तके भांडार ते महानगरपालिका स्तर या टप्प्यातील पाठ्यपुस्तकांची वाहतूक महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई या कार्यालयाकडून निश्चित केलेल्या वाहतुकदाराकडून करण्यात आलेली आहे. तसेच महानगरपालिका ते शाळा स्तरापर्यंतची पाठ्यपुस्तके महानगरपालिकेकडून ४ जून ते १० जून २०२५ या कालावधीत शाळेच्या मुख्याध्यापकांना वितरीत करण्यात आलेली आहेत.

ही पाठ्यपुस्तके संबंधित शाळेचे मुख्याध्यापक हे विभागातील पदाधिकारी, अधिकारी, पालक यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्या दिवशी दि.१६ जून २०२५ रोजी वितरित करतील अशी माहिती शिक्षण विभागाच्या उपआयुक्त संघरत्ना खिल्लारे यांनी दिलेली आहे.

## पालशेत येथे रेशनची हेराफेरी; किंगमेकर कोण...?

**रेशन वाटपात सेल्समन कडून हेराफेरी करून लाभार्थ्यांची फसवणूक केली जात होती,परंतु सुज्ञ लाभार्थ्यांनी स्वतःच्या हक्कासाठी केली तक्रार आणि याममध्ये त्यांना यश आले असून लाभार्थ्यांचे पुढील होणारे नुकसान टळले.**

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.१२, पालशेत (गुहागर) :** गुहागर तालुक्यातील पालशेत-निवोशी ग्रामपंचायत महसूल क्षेत्रातील पालशेत वि.का.स.सं सोसायटी (पालशेत सोसायटी) कार्यालयांतर्गत येणाऱ्या रेशन दुकानदार शिधापत्रिकाधारकांना धान्याचे वितरण करताना 'हेराफेरी' करीत असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. प्रत्येक शिधापत्रिकाधारकाला गहू आणि तांदूळ वितरित करताना एक ते दोन किलो असे धान्य कमी दिले जात असल्याची तक्रार लाभार्थींनी गुरुवार दिनांक १२ जून २०२५ रोजी पालशेत वि.का.स.सं सोसायटी (पालशेत सोसायटी) चेअरमन यांच्याकडे केली आहे.

पालशेत येथील रेशन दुकानावर धान्य कमी दिले जात असल्याची ही पहिलीच घटना समोर आली असून दुकानदार /सेल्समन यांच्याकडून हजारो किलो धान्याचा काळाबाजार सुरू असल्याची शक्यता वर्तवली जात आहे.

पालशेत वि.का.स.सं सोसायटी (पालशेत सोसायटी ) कार्यालयांतर्गत जवळ जवळ १००० (एक हजार) च्या आसपास शिधापत्रिका लाभार्थी आहेत. या लाभार्थ्यांना धान्याचे वितरण करण्यासाठी २ स्वस्त धान्याची दुकाने उपलब्ध आहेत.

केंद्र सरकारच्या नियमानुसार, पात्र शिधापत्रिकाधारकांना स्वस्त धान्य दुकानात प्रत्येक व्यक्तीमागे १ किलो गहू आणि ४ किलो तांदूळ मिळतो. त्यामुळे गरीब जनतेला दिलासा मिळतो.



मात्र, पालशेत येथे स्वस्त धान्य दुकानातील सेल्समन शिधापत्रिकाधारकांना धान्याचे वितरण करताना १ ते २ किलो धान्य कमी वाटप करीत असल्याचा प्रकार गुरुवार दिनांक १२ जून २०२५ रोजी दक्ष नागरिकांनी उघडकीस आणला आहे.

सदर बाबत दक्ष शिधापत्र धारकांनी अन्न पुरवठा विभाग गुहागर (तहसील कार्यालय) अन्नपुरवठा निरीक्षक यांची प्रत्यक्षात भेट घेऊन धान्य हेराफेरीचा झालेला प्रकार निदर्शनास आणून दिला, सदर प्रकरणी तात्काळ दखल घेत निरीक्षक यांनी रेशन दुकानातील सेल्समन यांना फोन करून सुरू असलेला फसवणुकीचा प्रकार वेळीच थांबवला,त्यामुळे शिधाधारकांचे पुढे होणारे नुकसान टळले.

पुढे असे प्रकार घडल्यास संबधितांवर योग्य ती कारवाई करण्यात येईल असे लाभार्थ्यांना आश्वासन देण्यात आले. सदर उघडकीस आलेल्या प्रकारात सेल्समन हेराफेरी करत असल्याचे समोर आले असले तरी पडद्यामागिल किंगमेकर कोण ? अशी चर्चा पालशेत-निवोशी विभागात जोरदार सुरू आहे.

## कळव्यातील नागरिकांचे कारशेड सुविधासाठी खासदारांकडे साकडं...

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.१२, कळवा (ठाणे ) :** कळवा कारशेड प्रवासी वाहतुकीसाठी बंद कारण्यापूर्वी समस्त कळवेकर नागरिकांसाठी अगोदर होम प्लॅटफॉर्म ची व्यवस्था करावी आणी मगच कारशेड बंद करावे या प्रमुख मागणीचे निवेदन आज कळवा कारशेड प्रवासी संघाच्या वतीने कल्याण लोकसभा क्षेत्राचे लोकप्रिय खासदार संसदरत्न श्रीकांत शिंदे यांना देण्यात आले. कळव्यातील कार्यसम्राट नगरसेवक मिलिंद पाटील यांच्या पुढाकाराने आयोजित केलेल्या 'खासदार आपल्या भेटीला'



या कार्यक्रमात खासदार आले असताना हे निवेदन दिले गेले.

सकाळच्या वेळी प्रामुख्याने मुंबईकडे जाण्याकरिता कळवा स्टेशन वरील गर्दीमुळे कळव्यातील बहुसंख्य प्रवासी कारशेड मधून सुटणाऱ्या ट्रेनचा उपयोग गेली अनेक वर्ष करीत आले आहेत.सकाळच्या मुख्यता कार्यालयीन वेळेत कळवा स्टेशनला ट्रेन पकडण्यासाठी प्रत्येकालाच खुप कसरत करावी लागत असल्याने प्रवासी कारशेड मधून निघणाऱ्या गाडीने प्रवास करतात. यामध्ये शाळा कॉलेजचे विद्यार्थी, महिला आणी जेष्ठ नागरिक देखील असतात.

पण आता मध्य रेल्वे प्रशासनाने अनधिकृत प्रवासी वाहतूक आणी रेल्वे रूळ ओलांडताना होणारे अपघात, ही करणे पुढे करुन प्रवासासाठी कारशेड बंद करण्याचा निर्णय घेतला आहे.

दरम्यान हा निर्णय घेताना मध्य रेल्वे प्रशासनाने

वाढत्या शहरीकरणामुळे गेल्या काही वर्षात झापाट्याने वाढलेल्या कळव्यातील प्रवाश्यांचा होणाऱ्या गैरसोईचा अजिबात विचार केलेला नाही. एकतर सकाळच्या वेळी कल्याण डोंबिवली कडून मुंबईकडे जाणाऱ्या ट्रेन खचाखच भरुन येत असल्याने कळव्यातील नागरिकांना ट्रेन मिळणे तर दुर पण साधे ट्रेनच्या दरवाजातून आत शिरता देखील येत नाही. काहीच पर्याय उपलब्ध नसल्याने काही प्रवासी कार्यालयात पोहचायला उशीर होत असल्याने दरवाज्यात लटकून कळवा ते ठाणे हा जीवघेणा प्रवास करतात पण या भयानक आणी खडतर प्रवासात आजवर कित्येक जणांचा ट्रेन मधून कळवा खाडीत मृत्यू देखील झाला आहे. मुंब्रा दुर्घटनेनंतर रेल्वे अपघातातील बळींचा विषय ऐरनिवार असताना कळवा कारशेड प्रवाशी वाहतुकीकरीता बंद करणे म्हणजे समस्त कळवेकर नागरिकांच्या जीवनाशी खेळण्याचा प्रकार आसल्याची संतप्त प्रतिक्रिया आज समस्त कळवेकर प्रवश्यामध्ये उमटत आहे.

याच अनुषंगाने कळवा प्रवासी संघांचे समन्वयक संजय पंडित, नारायण उतेकर, शैलेश सावंत, रवी पवार आणी शेखर काका भोर आदी सदस्यांनी खासदारांना भेटून निवेदनातून आपली मागणी मांडली. खासदार शिंदे यांनी देखील सदर महत्वपूर्ण मागणीची तात्काळ गांभीर्याने दखल घेत याबाबत रेल्वे प्रशासनाशी बोलणार आसल्याचे सांगितले. तसेच

कारशेड मध्ये होम प्लॅटफॉर्म सुरु केल्याशिवाय प्रवासी वाहतूक सेवा थांबवता येणार नसल्याचे खासदार श्रीकांत शिंदे यांनी सांगितले. दरम्यान या मागणीच्या पाठपुराव्यासाठी सर्वो तोपरी सहकार्य कारण्याचे आश्वासन शिंदे यांनी यावेळी दिले.

## राज्य अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेसाठी मुंबई उपनगर पूर्व- पश्चिम संघाची निवड

**अक्षराज : संदिप येवले**

**दि.१२, मुंबई :** महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन आणि पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशन यांच्या मान्यतेने आमदार सचिन भाऊ अहिर यांच्या मार्गदर्शनाखाली अठरा वर्षाखालील मुले आणि मुली यांची अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा पुण्यात रंगणार आहे. १८ वर्षाखालील पहिली मुले/मुलीराज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेसाठी मुंबई उपनगर संघाची निवड करण्यात आली आहे.

१४ ते १८ जून २०२५ या कालावधी दरम्यान श्री छत्रपती शिवाजी महाराज क्रिडा संकुल बालेवाडी, पुणे येथे हि स्पर्धा होणार असून मुंबई उपनगर पूर्व विभाग मुली- सेरेना म्हसकर(कर्णधार), मुले- उद्धव म्हानुर (कर्णधार), पश्चिम विभाग मुली- भार्गवी म्हात्रे (कर्णधार), मुले - पवन पांडे (कर्णधार) यांची निवड करण्यात आली आहे.

**मुंबई उपनगर (मुली)पूर्व विभाग -** सेरेना म्हसकर (कर्णधार), मुद्रा पाटील, तनश्री शिंदे, श्वेता शिंद्रुक, किरण शिंद्रुक, आस्था सिंग, श्रद्धा कांबळे, आर्या देवकर, प्रांजल जाधव, प्रिया टक्के, प्राजक्ता राजीवडे, सारा येवले, शर्वरी लांबे, भक्ती केंद्रे

**प्रशिक्षक :-** श्रीकांत पिंजारी

**संघ व्यवस्थापक :-** रमेश जावळे

**मुंबई उपनगर(मुले) पूर्व विभाग -** उद्धव म्हानुर ( कर्णधार), साई खोपकर, पूर्वेस मेस्त्री, आर्यन भोजने, अमित पिसाळ, रिजवान शेख, नारायण परब, यश मोरे, विवेक पोखरकर, ओमकार पाटील, अनिकेत धारा, ओमकार सोनवणे, चिंतन मोरे, लवकुश यादव.

**संघ प्रशिक्षक:-** हेमंत तोडणकर

**संघ व्यवस्थापक:-** संदेश शिंदे




**मुंबई उपनगर (मुली)पश्चिम विभाग** - भार्गवी म्हात्रे (कर्णधार), पूजा चिंदरकर, शलाका मेर्ढेकर, तन्वी बारागडे, संस्कृती पाटील, मनस्वी पठारे, ऐश्वर्या बोरा, प्रज्ञा लाड, नियती सावंत, कुम कुम सिंग, रिना धोपट, साक्षी गावडे, प्रिया कोठी, झांशी वाघमोडे,

**संघ प्रशिक्षक :-** अमित ताम्हाणेकर

**संघ व्यवस्थापक :-** योगेश रेवाळे

**मुंबई उपनगर (मुले) पश्चिम विभाग -** पवन पांडे (कर्णधार), सुरज यादव, समाधान कासार, सनी यादव, तेजस लांबर, निहाल जाधव, शिवा बिर्जे, गणेश उकिर्डे, कृष्णा कनोजिया, विजयनाथ पाल, वेदांत भुवड, हर्षद शिर्के, मधुर वानखेडे, आयुष पारदुले

**संघ प्रशिक्षक :-** कमलेश पालव

**संघ प्रशिक्षक :-** सतीश शेट्टी

## समृद्धी महामार्गावर जनावरांचा मुक्त संचार...

**अक्षराज : रविंद्र खाडे**

**दि.१२, शहापूर (ठाणे) :** नुकताच ५ जून रोजी मोठा इव्हेंट साजरा करून इगतपुरी ते आमणे या हिंदूहृदयसम्राट सम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गच्या शेवटच्या ७६ किलोमीटरटप्प्याचे लोकार्पण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार व एकनाथ शिंदे यांच्या हस्ते पार पडले. इगतपुरी ते आमणे दरम्यान हा रस्ता असून यामध्येमहाराष्ट्रातीलसर्वात लांब बोगदा समाविष्ट आहे. युती सरकारच ड्रीम प्रोजेक्ट असणाऱ्या या महामार्गावर सुरक्षेच्या दृष्टीने उपाययोजना करण्यात आल्या असल्याचे म्हटले जाते. या महामार्गाचे उद्घाटन झाल्यानंतरही जवळ जवळ ४ अपघात झाल्याचे समजते. हिंदूहृदयसम्राट सम्राट बाळासाहेब ठाकरे


मुंबई–नागपूर समृद्धी महामार्गावर झालेल्या अपघातांमुळे समृद्धी महामार्गाची ओळख मृत्यूचा महामार्ग अशी निर्माण झाली आहे.

आज या समृद्धी महामार्गावर शहापूर तालुक्यातील कासगाव - शेलवली दरम्यान महामार्गाचे सुरक्षेचे कडे भेदून एक गाय समृध्दी महामार्गावर दिसली. महामार्गाच्या पेट्रोलिंग टिमने गाईला सुखरूप बाहेर काढलं. परंतु या घटनेने समृद्धी महामार्गाच्या सुरक्षेवर प्रश्न चिन्ह निर्माण झाले आहे. या प्रकारामुळे मोठा अपघात घडण्याची शक्यता वाढली आहे.

# मुरबाड नगरपंचायतीत भाजपला खिंडार

## १० पैकी ९ नगरसेवक फुटून पक्षाच्याच उमेदवाराला पाडलं

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.१२, मुरबाड (ठाणे) :** मुरबाड नगरपंचायतीत भाजपचे ९ नगरसेवक एकत्र येत अलग गट बनवून 'मुरबाड परिवर्तन पॅनल' स्थापन करण्यात आलाय. त्यामुळे मुरबाड नगरपंचायतीतील भाजपचे वर्चस्व आता संपुष्टात आले आहे. मुरबाड नगरपंचायतीतील १० नगरसेवकांपैकी ९ नगरसेवकांनी स्वतंत्र गट स्थापन केला असून, या गटाला जिल्हाधिकारी कार्यालयाकडून मान्यता देखील देण्यात आली आहे. त्यामुळे मुरबाड नगरपंचायतीतील भाजपचे वर्चस्व संपुष्टात आले असून स्थानिक आमदार किसन कथोरे यांना मोठा राजकीय धक्का बसला आहे.

मुरबाड विधानसभा मतदारसंघात भाजप आमदार किसन कथोरे यांचा प्रभाव असला, तरी नगरपंचायतीत गेल्या निवडणुकीत भाजपने स्पष्ट बहुमत मिळवले होते. एकूण १७ नगरसेवकांपैकी भाजपचे १०, शिवसेनेचे ५, तर अन्य दोन अपक्ष नगरसेवकांनी नंतर भाजपला पाठिंबा दिला होता. त्यामुळे भाजपचे नगराध्यक्ष आणि उपनगराध्यक्ष निवडून आले. मात्र, काही दिवसांपूर्वी झालेल्या उपनगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत भाजपमधील अंतर्गत मतभेद उघड झाले. आमदार कथोरे यांनी शिवसेनेच्या नगरसेवकाला उमेदवारी दिल्याने भाजप नगरसेवकांमध्ये नाराजीचा सूर उमटला. प्रत्यक्ष निवडणुकीत काही नगरसेवकांनी अपक्ष उमेदवाराला मतदान करत भाजपच्या उमेदवाराचा पराभव घडवून आणला.

'मुरबाड परिवर्तन पॅनल' स्थापन, जिल्हाधिकाऱ्यांकडून मान्यताया घडामोडीनंतर भाजपचे ९ नगरसेवक एकत्र येत 'मुरबाड परिवर्तन पॅनल' स्थापन करण्यात आला. २६ मे रोजी नगरसेवक




मोहन गडगे यांच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयात गट नोंदणीसाठी अर्ज करण्यात आला होता. अखेर ९ जून रोजी जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी या पॅनलला स्वतंत्र गटाची मान्यता दिली. यामुळे आता मुरबाड नगरपंचायतीत भाजपकडे फक्त एक नगरसेवक आणि दोन समर्थक नगरसेवक उरले आहेत.


त्यामुळे पक्षाचे स्थानिक राजकीय गणित पूर्णपणे बदलले आहे. दरम्यान, भाजपचे ठाणे जिल्हा ग्रामीण अध्यक्ष जितेंद्र डाकी यांनी वेगळा गट झाल्याची कबुली दिली असली तरी, ते नगरसेवक अद्याप भाजपपासून फारसे दूर गेले नसल्याचा दावा केला आहे. उपनगराध्यक्षपदाच्या उमेदवारीबाबत काही नगरसेवकांमध्ये नाराजी होती, मात्र इतर कोणतीही नाराजी नाही. आम्ही त्यांच्याशी सातत्याने संपर्कात आहोत. भाजप प्रदेशाध्यक्षांच्या उपस्थितीत बैठक होणार होती, पण काही अडचणीमुळे ती होऊ शकली नाही. तरीही नगरसेवक आमच्यासोबतच आहेत, असे डाकी यांनी स्पष्ट केले.

# थोडक्यात

## गिरणी कामगार संभ्रमात ?

**अक्षराज : गणेश जाधव**

**दि.१२, नेरूळ (नवी मुंबई) :** मुंबईसह महाराष्ट्राच्या लढ्यात जे हुतात्मे झाले त्यात प्रामुख्याने गिरणी कामगार अग्रस्थानी होते. आज तोच गिरणी कामगार पुरता देशोधडीला लागला आहे. २००० ते २००१ या काळात तत्कालीन राजकारणी व उद्योगपती यांच्या चुकीच्या धोरणासाठी मुंबईतील गिरणी बंद करण्यात आल्या व वारसाहक्काने या गिरणींच्या जागेचा २५ टक्के हिस्सा हा गिरणी कामगार यांच्या हक्काचा असूनही आज २५ वर्ष उलटून गेली. तरी हा कष्टकरी गिरणी कामगार अजून न्यायाच्या व हक्काच्या घराच्या प्रतिक्षेत आपला लढा लढत आहे. आजपर्यंत अनेक सरकारे आली व अनेक मुख्यमंत्री आश्वासने देऊन गेले. परंतु गिरणी कामगारांना न्याय मात्र आज पर्यंत कोणीच दिलेला नाही, ही फार मोठी खंत आहे.



एकेकाळी महाराष्ट्र व मुंबईच्या संरक्षणार्थ छातीची ढाल करून उभा राहीलेला गिरणी कामगार आज स्वसंरक्षणाच्या लढाईत पुरता दुर्बल झालेला आहे. आजपर्यंत आश्वासनाच्या पलीकडे कामगारांच्या पदरात काहीही पडलेले नाही. एवढे सगळे होऊन ही आता कामगारांची हक्काची जागा मुंबईत असून कामगारांना मुंबई पासून १०० किलोमीटर लांब, शेलू, वांगणी अशा ठिकाणी घरांचे फॉर्म भरा. अशा पध्दतीच्या लिंक व मॅसेज पाठवले जात आहेत,हे पाप नक्की कोण करत आहे, ते समजण्या पलीकडचे आहे. या अशा वृत्तीमुळे गिरणी कामगार पुरता संभ्रमात पडलेला आहे. शासनाने विलंब न लावता गिरणी कामगारांना मुंबईत हक्काचे घर द्यावें,व हा चुकीचा संदेश पाठवणारे कोण भामटे आहेत. त्याचा वेळीच बंदोबस्त करावा,अशी मागणी गिरणी कामगारांनी लावून धरलेली आहे.

# आषाढी यात्रा कालावधीत मंदिर समितीने भाविकांच्या सुलभ दर्शनाला प्राधान्य द्यावे - पालकमंत्री गोरे

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.१२, पंढरपूर :** आषाढी शुद्ध एकादशी सोहळा ६ जुलै रोजी असून आषाढी यात्रा सोहळ्यानिमित्त श्री विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी राज्याच्या विविध जिल्ह्यातून तसेच परराज्यातून मोठ्या प्रमाणात भाविक येत असतात. दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना मंदिर समितीने आवश्यक सुविधा पुरविण्याबरोबरच सुलभ व सुखकर दर्शन व्हावे. यासाठी आवश्यक नियोजन करावे. तसेच आषाढी एकादशीला विठ्ठल रुक्मिणी मंदिरात मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शासकीय महापूजा सूरू असतानाहीभाविकांना श्री विठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन व्हावे. यासाठी आषाढी एकादशीच्या शासकीय महापुजा कालावधीत श्रींचे मुखदर्शन सुरू ठेवावे. अशा सूचना पालकमंत्री तथा ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे यांनी दिल्या.

या बैठकीस आमदार समाधान आवताडे, मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, जिल्हा पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, मंदिर समितीचे सदस्य शकुंतला नडगिरे, ज्ञानेश्वर महाराज जळगांवकर, डॉ.दिनेशकुमार कदम, संभाजी शिंदे,प्रांताधिकारी सचिन इथापे, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, कार्यकारी अभियंता श्रीनिवास गुजरे, व्यवस्थापक मनोज श्रोत्री, वास्तु विशारद श्रीमती तेजस्विनी आफळे, लेखाधिकारी मुकेश अनेचा, तसेच ऑनलाईनद्वारे मंदिर समितीचे सदस्य उपस्थित होते. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी शासकीय महापूजेच्या वेळी मुखदर्शन व्यवस्था सुरू ठेवावी. तसेच शासकीय महापूजा



संपताच तात्काळ रांगेतील भाविकांची दर्शन व्यवस्था पूर्ववत करावी. शासकीय महापुजेवेळी मंदिरात गर्दी होणार नाही. याची दक्षता घेऊन महापूजेला उपस्थितांची संख्या मर्यादित राहील याची दक्षता घेवून, शासकीय महापूजा विधीवत व परंपरेने पार पाडण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी. भाविकांना जलद दर्शन व्हावे. यासाठी व्हीआयपी दर्शन व्यवस्थेवर निर्बंध असावेत. श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराचे जतन व संवर्धनाचे काम सुरू आहे.

त्या कामामुळे विद्युत वाहक केबल अस्ताव्यस्त झाल्या असून त्या केबल २४ जून पर्यंत पूर्ववत कराव्यात. तसेच यात्रा कालावधीत दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना मंदिरात कोणताही अडथळा येऊ नये. यासाठी सद्यस्थितीत सुरू असलेले काम थांबवून सदर ठिकाणची स्वच्छता करावी. या कालावधीत नामदेव पायरी येथे भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होते. गर्दीमुळे कोणतीही दुर्घटना घडू नये. यासाठी पोलीस प्रशासनाने आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात. दर्शन रांगेतील स्काय व तात्पुरते उड्डाण पूलांची पाहणी करून ते तांत्रिकदृष्ट्या योग्य आहेत का याची तपासणी करावी तसेच मंदिर व मंदिर परिसरातील इलेक्ट्रिक ऑडिट, फायर ऑडिट करण्यात यावे अशा सूचना पालकमंत्री श्री. गोरे यांनी यावेळी दिल्या.

यावेळी मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर म्हणाले, भाविकांना श्रींचे जलद दर्शन व्हावे. तसेच दर्शन रांग जलद गतीने चालावी त्याचबरोबर घुसखोरी रोखण्यासाठी ज्यादा सुरक्षा रक्षकांची नियुक्ती मंदिर समितीकडून करण्यात येणार आहे. श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी समितीच्या वतीने विमा उतरविण्यात येणार आहे. दर्शन रांग, दर्शन मंडप, मंदिर परिसर या ठिकाणची वेळोवेळी स्वच्छता करण्यात येणार असून, दर्शन रांगेतील भाविकांना मोफत चहा, नाष्टा जेवण देण्यात येणार असल्याचे सांगितले.

तसेच मंदिर समितीकडून दर्शन रांगेत बॅरिकेटिंग, मॅट टाकणे, बसण्याची सुविधा, शुद्ध पिण्याचे पाणी, कुलर, स्वच्छता गृह, विश्रांती कक्ष लाईव्ह दर्शन व्यवस्था, सार्वजनिक सूचना प्रणाली आदी व्यवस्था उपलब्ध राहणार आहे. वारकरी भाविकांच्या सुरक्षेसाठी १२६ सीसीटीव्ही कॅमेरे कार्यरत राहणार आहेत. तसेच तसेच चंद्रभागा वाळवंट येथे महिला भाविकांच्या सोयीसाठी चेंजिंग रूम व दर्शन रांगेत हिरकणी कक्ष उभारण्यात येणार असल्याचे यावेळी कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगितले.

## बोरीत फलटण उद्यानविद्या महाविद्यालयाचा कार्यानुभव कार्यक्रम

**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.१२, खंडाळा (सातारा) :** फलटण एज्युकेशन सोसायटी संचलित श्रीमंत शिवाजीराजे उद्यानविद्या महाविद्यालय, फलटण येथील सातव्या सत्रातील उद्यानदुत प्रशिक्षणासाठी बोरी ता.खंडाळा जि.सातारा येथे दाखल झाले असुन बोरी ग्रामपंचायत येथे सरपंच, उपसरपंच, कृषि सहायक, तलाठी व ग्रामस्थांनी या उद्यानदुत विद्यार्थ्यांचे उत्स्फूर्त स्वागत केले. ग्रामीण उद्यानविदया कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत सुमारे २२ आठवडे येथे वास्तव्यास राहणार असलेले हे विद्यार्थी शेतकऱ्यांना शेतिविषयक माहिती,नवीन तंत्रज्ञान याबाबत माहिती देऊन गावामध्ये शेतिविषयक विविध उपक्रम व कार्यक्रम राबविणार आहेत. माती परीक्षण,फळबाग लागवड,एकात्मिक कीड रोग, बीज प्रक्रिया, आधुनिक शेती औजारांचे वापर, शेतीचा आर्थिक फायदा, जनावरांचे लसीकरण आदीबाबत उपस्थित गावकरी व शेतकऱ्यांशी संवाद साधणार असल्याचे या उद्यानदुत यांनी सांगितले. उद्यानविद्या विषयक जनजागृती करण्यास उद्यानविदया कार्यानुभव यांचा अभ्यास उद्यानकदुत करणार आहेत. माने आकाश, रानभरे पार्थ, अभंग सनी, बर्गे रुपेश, भोईटे रविराज हे उद्यानदूत येथे दाखल झाले आहेत. त्यांना सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन सरपंच बापूराव धायगुडे, कृषि सहायक मोरे, लिपिक रूपाली येळे, ग्रामपंचायत सदस्य व सर्व ग्रामस्थ यांनी यावेळी दिले. उद्यानविद्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.डी.निंबाळकर, कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.यु.डी. चव्हाण, कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.जे.व्ही. लेंभे व प्रा.ए.डी.पाटील यांचे मार्गदर्शन या विद्यार्थ्यांना लाभणार आहे.




## मृत्यूशी झुंज देत प्राध्यापकाने ३ महिन्या नंतर घेतला अखेरचा श्वास



**अक्षराज: दिवाकर घेर**

**दि.१२, नागपूर :** दुचाकीच्या अपघातात गंभीर जखमी झालेल्या एका महाविद्यालयातील प्राध्यापकाने साडेतीन महिन्यानंतर अखेरचा श्वास घेतला असून खापरखेडा परिसरात सर्वत्र शोककळा पसरली आहे. मृतक प्राध्यापकाचे नाव अरुण देवराव अंजनकर (५०) असे आहे. प्राध्यापक अरुण अंजनकर हे खापरखेडा येथील शंकरराव चव्हाण विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात कार्यरत होते. प्राध्यापक अरुण अंजनकर यांचे वार्ड क्रमांक ४ खापरखेडा येथे घर असून काही दिवसांपूर्वी दुर्गामाता नगर कोराडी रोड येथे नविन घरी राहायला गेले होते. २४ फेब्रुवारीला दुचाकीने महाविद्यालयात येत असताना खापरखेडयातील मुख्य बाजारपेठेत विरुद्ध दिशेने येणाऱ्या दुचाकी चालक तुषार युवनाते याने जोरदार धडक दिली. सदर घटनेत प्राध्यापक अरुण अंजनकर फॅक्चर झाले शिवाय त्यांच्या मेंदूला जबर दुखापत झाली होती. मॅक्स मल्टी स्पेशालिटी या खाजगी रुग्णालयात त्यांच्या मेंदूवर शस्त्रक्रिया करण्यात आली. जवळपास ४५ दिवस त्यांच्यावर उपचार सुरू होते. यादरम्यान अंजनकर कुटुंबीयांनी लाखो रुपये खर्च केले. मात्र ते कोमातून बाहेर आलें नाही. शेवटी लता मंगेशकर रुग्णालयात हलविण्यात आले मात्र तिथेही डॉक्टरांनी हात वर केले तब्बल साडेतीन महिन्यानंतर दिनांक ११ जून मृत्यूशी झुंज देत अखेरचा श्वास घेतला. शोकाकुल वातावरणात मानकापूर घाटावर अंत्यसंस्कार करण्यात आले. याप्रसंगी शिक्षक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महाराष्ट्राबरोबरच जिल्ह्याच्या वाट्यालाही अभूतपूर्व निधी संकल्पसे सिद्धीतक झेप : आमदार पाटील

**अक्षराज : विकास वाघ**

**दि.१२, धाराशिव :** यूपीएच्या १० वर्षांच्या सत्ताकाळात महाराष्ट्राच्या वाट्याला साधारणपणे १ लाख कोटी रुपये निधी मिळाला होता.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मागील ११ वर्षांच्या कार्यकाळात राज्याच्या वाट्याला आलेला निधी युपीए सरकारच्या दहापट म्हणजेच १० वर्षात १० लाख कोटी रुपये एवढा आहे. नरेंद्र मोदी यांच्यामुळे राज्याला ऐतिहासिक फायदा झाला आहे आणि महाराष्ट्राबरोबरच धाराशिव जिल्ह्याच्या वाट्यालाही अभूतपूर्व निधी मिळाला असल्याची माहिती मित्रचे अध्यक्ष तथा आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

भाजपाच्या प्रतिष्ठान भवन कार्यालयात नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारच्या ११ वर्षांच्या यशस्वी पुर्ततेबद्दल पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. यावेळी आमदार पाटील बोलत होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळात देशभरात झालेल्या



अनेक अभूतपूर्व योजना, उपक्रम आणि विकासकामांचा आलेख त्यांनी उपस्थितांसमोर सादर केला. माता-भगिनींच्या आयुष्याला अधिक सक्षम करण्यासाठी नरेंद्र मोदी यांनी घेतलेल्या परिश्रमाबद्दलही त्यांनी जिल्ह्यातील माता-भगिनींच्या वतीने नरेंद्रजी मोदी यांचे आभार मानले. त्याचबरोबर केंद्र सरकारच्या माध्यमातून महाराष्ट्र आणि धाराशिव जिल्ह्याच्या वाट्याला आलेल्या अनेक महत्त्वपूर्ण आणि भरीव बाबींची त्यांनी माहिती दिली.

पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम धाराशिव जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात राबविण्यात आला आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून सलग तीन वर्ष जिल्हा राज्यात अव्वल ठरला. जिल्ह्यातील दीड हजारपेक्षाही अधिक युवकांनी या उपक्रमाच्या माध्यमातून स्वतःचा नवा उद्योग सुरू केला आहे. त्यांच्या या उद्योगाच्या माध्यमातून स्वतःसह त्यांनी इतरांसाठीही रोजगाराच्या संधी निर्माण केल्या असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी यावेळी सांगितले.

धाराशिव जिल्ह्यातील कौडगाव एमआयडीसी मध्ये तांत्रिक वस्त्रोद्योग निर्मिती प्रकल्प सुरू करण्याच्या दृष्टीने पायाभूत सुविधांना वेग आला आहे. देश पातळीवर पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी राष्ट्रीय टेक्निकल टेक्सटाईल मिशन हे धोरण जाहीर केले आहे. त्याचा फायदा आपल्या जिल्ह्यातील कौडगाव एमआयडीसीलाही होणार आहे.

त्यामुळे देशातील आणि परदेशातील इच्छुक गुंतवणूकदारांना मोठ्या प्रमाणात परतावा आणि वेगवेगळ्या सोयी सुविधा उपलब्ध होणार आहेत. त्यातून जिल्ह्यात दहा हजाराहून अधिक रोजगार निर्मिती उपलब्ध होणार असल्याचा विश्वासही आमदार पाटील यांनी व्यक्त केला.

पर्यटन, रेल्वे त्याचबरोबर रस्ते विकास, उड्डाणपूल, पर्यायी रस्ते, महामार्गावर विद्युत व्यवस्था, विविध प्रकारचे अनुदान अशा अनेक बाबींच्या माध्यमातून जिल्ह्याला केंद्र सरकारच्या माध्यमातून अभूतपूर्व असा निधी प्राप्त झाला आहे. एकट्या धाराशिव जिल्ह्यात ६,५०० कोटी रूपयांची २४ राष्ट्रीय महामार्गाची कामे मंजूर केली आहेत. त्यातील ११ कामे पूर्ण झाली असून उर्वरित १३ कामे सध्या प्रगतीपथावर आहेत.

धाराशिवकरांची गरज व मागणी लक्षात घेवून तुळजापूर-नळदुर्ग, तुळजापूर-औसा, धाराशिव शहरातील बाय पास, तुळजापूर बाय पास, सिंदफळ व येडशी येथे उड्डाणपूल, या कामांना केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी साहेबांनी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वाखाली मंजूरी दिली. सूरत-चेन्नई महामार्ग, सोलापूर-धुळे, सोलापूर-उमरगा असे महामार्गाचे जाळे धाराशिव जिल्ह्यात आज निर्माण झाले आहे. युपीए सरकारच्या काळात धाराशिव जिल्ह्यात केवळ १९५ किलोमीटर लांबीचा राष्ट्रीय महामार्ग होता.

आज त्याच राष्ट्रीय महामार्गाची जिल्ह्यातील लांबी ४१८ किलोमीटर एवढी झाली आहे. मागील केवळ ११ वर्षांच्या काळात धाराशिव जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्गाची लांबी २२३ किलोमीटर इतकी वाढली आहे.

प्रधानमंत्री विमा योजनेच्या माध्यमातून खरीप २०२० पासून जिल्ह्यातील शेतकऱ्यांना जवळपास २००० कोटी रुपये मिळाले असून संकल्प केला आणि तो सिद्धीस नेला म्हणून तर संकल्प से सिद्धीतक हा मूलमंत्र घेऊन देशातील आणि राज्यातील आपले सरकार सर्वसामान्य नागरिकांच्या हितासाठी अखंड कार्यरत असल्याचे ही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले.